# मिरा भाईंदर महानगर पालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेस नोट

- **मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या ताफ्यात सक्शन आणि जेटींग मशीन दाखल**

शहरातील मलजल वाहिन्या, भूमिगत गटार, सेफ्टी टँक आणि मलजल संकलन केंद्रांची नियमित स्वच्छता आणि देखभाल करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेकच्या ताफ्यात अत्याधुनिक सक्शन आणि जेटींग मशीन दाखल झाल्या आहेत.त्यातील एक मशीन ८ टन तर दुसरी मशीन १८.५ टन एवढ्या वजनाची आहे. या मशिनीमुळे स्वच्छता परिणामकारक होणार आहे शिवाय कर्मचाऱ्यांना देखील सुरक्षितपणे काम करता येणार आहे.

केंद्र शासनाच्या गृहनिर्माण आणि शहर विकास मंत्रालयाने राज्यातील निवडक शहरांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर मलजल वाहिन्यां, भूमिगत गटार,सेफ्टी टँक तसेच मलजल संकलन केंद्राची यांत्रिकी पद्धतीने स्वच्छता करण्यासाठी अत्याधुनिक सक्शन आणि जेटींग मशीन उपलब्ध करून दिल्या आहेत. केंद्र व राज्य शासनाच्या निधीतून मिरा भाईंदर महापालिकेला या संक्शन आणि जेटींग मशिन मिळाल्या आहेत. या मशीनच्या सहाय्याने आता मलजल वाहिन्या, भूमीगत गटार, सेफ्टी टँक व मलजल संकलन केंद्रांची स्वच्छता नियमित आणि अत्यंत प्रभावी पद्धतीने करता येणार आहे. स्वच्छतेसाठी मेहनत करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या आरोग्याची जबाबदारी महत्त्वाची असते. ते लक्षात घेऊन या अत्याधुनिक यंत्रसामुग्री आणण्यात आल्या आहेत. यामुळे कर्मचाऱ्यांच्या आरोग्याचा आणि सुरक्षिततेचा प्रश्न मिटला आहे. या निर्णयामुळे मिरा भाईंदर शहरात स्वचछता करणारी यंत्रणा अधिक सक्षम झाली आहे. या नवीन तंत्रज्ञानाच्या मदतीने शहराला अधिक स्वच्छ, सुंदर आणि आरोग्यदायी बनवण्याचा निर्धार मिरा भाईंदर महानगरपालिकेने व्यक्त केला आहे.या यंत्रांच्या वापरामुळे स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या आरोग्य सुरक्षिततेत हा एक मोठा बदल नक्कीच होणार असा विश्वास मनपा आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से) यांनी व्यक्त केला आहे